# भारतीय लोकशाहीची अमृतमहोत्सवी वाटचाल


**प्रा. डॉ. दत्ता मा. कुचेलवाड**
नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
औंढा नागनाथ, जि. हिंगोली.



**सिध्दी पब्लिकेशन हाऊस, नांदेड**



Sakri (Dhule)
PRINCIPAL
S.S's Smt V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

संपादक
प्रा. डॉ. दत्ता मा. कुचेलवाड
नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औंढा नागनाथ, जि. हिंगोली.
मो. नं. ९४२३३ २४६४७

प्रकाशक
सिध्दी पब्लिकेशन हाऊस
६२४, बेलानगर, भावसार चौक,
तरोडा (खु.) नांदेड ३ ४३१६०५
मो. ९६२३९७९०६७
www.wiidrj.com

मुद्रक
अनुपम प्रिंटर्स , श्रीनगर, नांदेड (महा.)
९१७५३३२४४३७

प्रथमावृत्ती : १० ऑक्टों. २०२२
सर्वाधिकार : संपादक अधीन

मुखपृष्ठ : तेजस रामपूरकर

अक्षरजुळवणी : डॉ. राजेश उंबरकर

मूल्य : १५०/-

सदरील ग्रंथातील कोणताही भाग किंवा मजकुराकरीता सदरील संशोधक स्वतः
जबाबदार राहतील संपादक किंवा प्रकाशक जबाबदार असणार नाही.

Sakri (Dhule)

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U.Patil Arts &
Late Dr. B.S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist. Dhule

# प्रादेशिक पक्षांच्या उदय व विकासाचा अभ्यास

**डॉ. शरद बाबुराव सोनवणे**
सहयोगी प्राध्यापक — राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री जि. धुळे

**प्रस्तावना**

भारत हा विविधतापूर्ण देश आहे. त्यामुळे येथे वेगवेगळया अस्मिता अस्तित्वात असल्याचे दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळात या सर्वांना स्वातंत्र्यलढ्याच्या एकाच छताखाली आणण्याचे काम भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने केलेले आहे. त्यामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस पक्ष भारतभर विस्तारला. विभिन्न समुहांच्या वेगवेगळया हितसंबंधांना सामावून घेण्याची कला व क्षमता सुरुवातीच्या काळात काँग्रेस पक्षाकडे होती. अर्थात, स्वातंत्र्य चळवळीचा वारसा असल्यामुळे, आरंभीच्या भारतीय राजकारणात काँग्रेस हा एकमेव प्रबळ पक्ष होता.

स्वातंत्र्य आंदोलनाच्या कालखंडात काँग्रेसच्या सर्वसमावेशकतेला आव्हान देणारे आणि वेगवेगळया धार्मिक, संस्कृतीक, जातीय विचारात्मक आणि इतर अस्मिता व हितसंबंधांच्या आधारे, मुस्लिम लिग, हिंदु महासभा, शिरोमणी अकाली दल, साम्यवादी पक्ष, समाजवादी पक्ष, जस्टीस पार्टी असे अनेक राजकीय पक्ष उदय पावले होते. याचा अर्थ अस्मितांचे राजकारण स्वातंत्र्यपूर्व काळात आकाराला आले होते. परंतु



Sakri (Dhule)
PRINCIPAL
I.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसने अनेक वर्षे त्यांच्यावर मात करून त्यांना काँग्रेसमध्ये सामावून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र १९६७ पासून भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांनी पाय रोवण्यास सुरुवात केली. पुढे १९८९ साली केंद्रात खऱ्या अर्थाने आघाडीच्या राजकारणाचे पर्व सुरू झाल्यावर प्रादेशिक पक्षांचा प्रभाव वाढला. त्यामुळे नंतरच्या काळात प्रादेशिक पक्ष प्रभावी ठरले.

**प्रादेशिक पक्षांचा उदय व विकास**

भारतातील वेगवेगळया प्रादेशिक पक्षांचा विचार करता असे दिसते की, काही पक्ष प्रादेशिक अस्मितेतून उभे राहिले आहे. राज्याची भाषा, इतिहास, संस्कृती ही त्या त्या राज्याची अस्मिता ठरते. ही अस्मिता जपावी, वाढवावी या भावनेतून काही पक्ष निर्माण झाले. तर संपूर्ण देशभर पसरलेल्या काँग्रेसच्या विरोधातही काही प्रादेशिक पक्ष जन्माला आले.[१] बहुतेक प्रादेशिक पक्षांचा उदय जन आंदोलनामधून झालेला आहे. 'द्रमुक' पक्षांचा जन्म 'द्रविड कळघम'च्या ब्राम्हण विरोधी राजकारणातून झाला आहे. तर तेलगू देसमचा जन्म, काँग्रेस सरकारने तेलुगू लोकांच्या स्वाभिमानास दुखावल्यामुळे झाला. तर परदेशी लोकांविरोधी आंदोलनातून 'आसाम गण परिषद' (आगप) हा पक्ष जन्मला.[२] महाराष्ट्रात मुंबई शहरातील दक्षिणात्य लोकांच्या विरोधातील आंदोलनातून, सुरुवातीला बिगर राजकीय असलेल्या शिवसेनेचा जन्म झाला.

प्रादेशिक पक्षांच्या संदर्भात सुहास पळशीकर यांनी अतिशय समर्पकपणे लिहिले आहे की, "सर्वसाधारणपणे प्रादेशिक अस्मिता, राज्यनिर्मिती, स्वायत्तता आणि प्रादेशिक विकास हे प्रादेशिक पक्षांच्या



Sakri (Dhule)
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri Tal.Sakri, Dist.Dhule

वैचारिक विश्वाचे मुख्य घटक असतात. मात्र 'प्रादेशिकता' ठरवितांना काही वेळा गैरप्रादेशिक घटकांना महत्त्व प्राप्त होते. तामिळनाडूत द्रविड चळवळीने तामिळ प्रादेशिकता विशद करताना आर्य—विरोध, उत्तर—विरोध आणि ब्राह्मण—विरोध हे चार मुद्दे सातत्याने अधोरेखित केले. म्हणजे तामिळी प्रादेशिकता हीच मुळी अनार्य आणि ब्राह्मणेतर आहे; असाच हा अप्रत्यक्ष दावा आहे. पंजाबात अकाली दलाची पंजाबी प्रादेशिकता, शीख अस्मितेत बेमालूमपणे मिसळते. तर उत्तराखंडच्या प्रादेशिकतेत आरक्षणविरोध आणि उच्चवर्णीयत्वाचा अभिमान समाविष्ट होता. महाराष्ट्रात शिवसेनेने मराठीपणालाच 'शिवाजी' ह्या प्रतीकाद्वारे परकीय आक्रमण विरोधी, दिल्ली विरोधी आणि मुस्लिम विरोधी परिमान मिळवून दिले. थोडक्यात, केवळ एका भौगोलिक प्रदेशाच्या आधारे प्रादेशिकता घडत नाही. संस्कृतीक, ऐतिहासिक वारश्याच्या आधारे निवड करून प्रादेशिकता मर्यादित केली जाते.[३]

अनेकदा राष्ट्रीय पक्षांमध्ये फुट पडून देखील प्रादेशिक पक्ष जन्म घेतात. परंतु त्यांचा आधार केवळ एकाच प्रदेश व राज्यापुरता मर्यादित असल्यामुळे, त्यांना तांत्रिकदृष्ट्या प्रादेशिक पक्ष म्हटले जाते. वस्तुतः आपल्या प्रादेशिक सीमा ओलांडण्याची त्यांची सतत धडपड चालू असते. परंतु त्यांचे सामाजिक आधार व राजकारण्यांच्या मर्यादांमुळे असे पक्ष प्रादेशिक सीमेत अडकून पडतात. काँग्रेस व जनता दल या राष्ट्रीय पक्षांमधून फुटून निघालेले पक्ष हे या प्रकारच्या प्रदेशबद्ध प्रादेशिक पक्षांची उदाहरणे आहेत. काँग्रेसमधून फुटून निघालेला 'तृणमूल काँग्रेस' पक्ष सुरुवातीला



Sakri (Dhule)
PRINCIPAL
Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

प्रादेशिक पक्ष होता. परंतू आता त्याला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळाली आहे.

एकंदरीत प्रादेशिक पक्ष हे त्या—त्या राज्यातील/प्रदेशातील प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून राजकारण करणारे पक्ष असतात. म्हणून प्रादेशिक विकास, प्रादेशिक अस्मिता, भाषेचा मुद्दा, राज्यास स्वायत्तता किंवा राज्यास विशेष दर्जाची मागणी अशा मुद्यांवर प्रादेशिक पक्षाचे राजकारण आधारलेले असते.

**प्रादेशिक पक्षांची वैशिष्टे**

भारतीय राजकारणात प्रादेशिक आणि राज्यस्तरीय पक्षांची संख्या सातत्याने वाढत आहे. या प्रादेशिक पक्षांची काही प्रमुख वैशिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१. भारतीय राजकारणात राज्यस्तरीय अथवा प्रादेशिक पक्षांचा प्रभाव किंवा वर्चस्व १९६७ च्या चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर वाढू लागले.
२. भारतातील प्रादेशिक पक्ष हे सामान्यत: राज्यस्तरीय पक्ष आहेत.
३. या राज्यस्तरीय पक्षांची प्रमुख मागणी राज्य स्वायत्ततेची आहे.
४. या राज्यस्तरीय पक्षांचा प्रमुख प्रतिस्पर्धी काँग्रेस पक्ष राहिलेला आहे.
५. राज्यस्तरीय पक्षांचे आवाहन व आधार संकुचित असतात. उदा. संस्कृती, जातीयता आणि धार्मिकता आदी.
६. प्रादेशिकवादाचा उदय केंद्र विरोधी भावनेतून होतो.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
...Smt. V.U.Patil Arts & ... Dr. B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

७. प्रादेशिकता हा वस्तुतः सत्ता प्राप्तीचा सोपा मार्ग आहे; ज्यामुळे राष्ट्रीय राजकारणातील पक्ष अनेक तात्कालिक (सोपे) मार्ग वापरतात.[४]

**प्रादेशिक पक्षांचे वर्गीकरण**

भारताने बहुपक्ष पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. त्यामुळे भारतात राष्ट्रीय पक्षांबरोबरच अनेक प्रादेशिक पक्ष देखील उदयाला आले. भारत एक विशाल देश असून, येथे भाषा, संस्कृती, धर्म, जाती आणि आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून विविधता दिसून येते. भारतातील या वैविध्याला अस्मितेची जोड देऊन किंवा आर्थिक विकासाच्या बाबतीतील मागासलेपणाचा मुद्दा हाती घेऊन, भारतातील अनेक राज्यांमध्ये विविध प्रादेशिक पक्षांचा उदय झालेला आहे.

प्रादेशिक पक्षांचे साधारणतः तीन प्रकारात वर्गीकरण करता येते.

१. विशिष्ट जात किंवा धर्माशी संबंधित राजकीय पक्ष. उदा. तामिळनाडूमधील द्रमुक, पंजाबमधील अकाली दल, जम्मू काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्स तसेच महाराष्ट्रातील शिवसेना.

२. दुसऱ्या प्रकारात काँग्रेस पक्षामधून फुटून उदयाला आलेल्या प्रादेशिक पक्षांचा समावेश होतो. जसे की, भारतीय क्रांतीदल, बांगला काँग्रेस आदी.

३. तिसऱ्या प्रकारात फॉरवर्ड ब्लॉक, किसान मजूर पक्ष, यासारख्या विशिष्ट विचारधारा असणाऱ्या पक्षांचा समावेश होतो.[५]

**प्रादेशिक पक्षांचे राजकारण प्रभावित करणारे घटक**

वर्तमान भारतीय राजकारणात राष्ट्रीय राजकारणाला प्रभावित करण्याची प्रादेशिक पक्षांमधील क्षमता अधिक वृद्धिंगत झाली आहे. याचे कारण



Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist Dhule

राष्ट्रीय पक्षांचा घटता जनाधार असल्याचे दिसते. तर दुसऱ्या बाजूला प्रादेशिक पक्षांचे महत्व अधिक वाढतांना दिसत आहे. भारतीय राजकारणातील हा नवप्रवाह मागील चार दशकांपासून पहावयास मिळत आहे. त्याची चर्चा अभ्यासाच्या दृष्टिने करावी लागेल.

**भाषा व प्रदेश**

प्रा.मॉरीस जोन्स लिहितात की, "प्रदेशवाद आणि भाषेचा प्रश्न भारतीय राजकारणात एवढा ज्वलंत प्रश्न राहिलेला आहे की, त्याचा सध्याच्या राजकीय इतिहासावर खोलवर परिणाम झाला आहे. कधी कधी राष्ट्रीय एकात्मतेसमोरील खरी समस्या प्रदेशवाद हीच असल्याचे वाटते."[६] विशेष म्हणजे १९५६ ची राज्यपुनर्रचना भाषेच्या आधारावर झाली आणि प्रादेशिक पक्षांनी भाषा व प्रदेशाचा आधार घेऊन, आपली पाळेमुळे अधिक मजबूत केली व आपले प्रभावी राजकारण सुरू केले.

भारत हा बहुभाषिक देश आहे. इ.स. १९०२ च्या जनगणनेनुसार भारतात १७९ भाषा व ५४४ स्थानिक भाषा बोलल्या जात होत्या.[७] "राष्ट्रीय चळवळीच्या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने १९२८ ते १९४४ या कालावधीत तीन वेळा भाषेच्या आधारावर प्रांताची पुनर्रचना करण्याचे समर्थन केले होते. १) ऑक्टोबर १९३७ मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या अधिवेशनात भाषेच्या आधारावर आंध्रप्रदेश आणि कर्नाटक प्रांताच्या निर्मितीची मागणी करण्यात आली. २) जुलै १९३८ मध्ये वर्धा येथे भरलेल्या 'काँग्रेस वर्किंग कमिटी'च्या बैठकीत आंध्र, कर्नाटक तसेच केरळ मधील जनतेच्या भाषिक प्रांतरचनेच्या मागणीचे समर्थन केले. तसेच काँग्रेस सत्तेवर आल्यावर



Sakri (Dhule)
PRINCIPAL
I.S.S's Smt. V.U.Patil Arts & Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

भाषिक प्रांतरचनेच्या दृष्टीने पावले उचलण्याचे आश्वासनही देण्यात आले होते. ३) १९४५–४६ च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात भाषिक व सांस्कृतिक एकरूपतेच्या आधारावर प्रशासकीय विभागांच्या निर्मितीचा मुद्दा अंतर्भूत केला होता."[८] १९२८ च्या नेहरू अहवालात देखील भाषेच्या आधारावर प्रांतरचनेची मागणी होती. परंतु "आश्चर्याची बाब म्हणजे, ज्या काँग्रेसने राष्ट्रीय चळवळीच्या काळात जवळजवळ तीन दशकांपर्यंत भाषेच्या आधारावर प्रांतरचनेच्या मागणीचा पुरस्कार केला होता; तीच काँग्रेस स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषिक प्रांतरचनेच्या मुद्यावर गोंधळात पडली. पंडित जवाहरलाल नेहरूंनी संविधानसभेत भाषेच्या आधारावर प्रांतरचनेस विरोध केला. २७ नोव्हेंबर १९४७ रोजी संविधानसभेत भाषिक आधारावर प्रांतरचनेस विरोध करताना ते म्हणाले होते की, "प्रथम प्राधान्य हे प्राथमिक गोष्टींना दिले पाहिजे आणि भारताची प्राथमिक गरज सुरक्षितता आणि स्थिरता ही आहे."[९]

देशाच्या अनेक भागामधील जनतेच्या मनात स्वातंत्र्यपूर्व काळापासून वसलेल्या भाषिक प्रांतरचनेच्या मागणीकडे दुर्लक्ष करणे सरकारला अशक्य होते. म्हणून "घटना समितीने जून १९४८ मध्ये भाषिक राज्यपुर्नरचना समिती श्री. दार यांच्या नेतृत्वाखाली नेमली. श्री. दार यांनी आपला अहवाल १९४८ च्या डिसेंबर मध्ये सादर केला. दार समितीने भाषिक राज्यांची कल्पना लोकांच्या मनात दृढ असल्याचे मान्य केले व या मागणीला फार मोठा पाठिंबा असल्याचे मान्य केले. परंतू राष्ट्र सध्या आणीबाणीच्या काळात आहे व अशा वेळी भाषावार प्रांतरचना हा मुद्दा गौण



Sakri (Dhule)
PRINCIPAL
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

असून, अन्य महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष देण्याची गरज आहे. भाषा हा एकच व प्रमुख घटक मानून नवी प्रांतरचना करणे हे सध्या राष्ट्राच्या हिताचे नाही. राष्ट्रवादाला प्रोत्साहन देणाऱ्या सर्व घटकांना अग्रक्रम देणे जरुरीचे आहे व जे घटक राष्ट्रवादाच्या प्रगतीच्या आड येतील त्यांचा त्याग केला पाहिजे, असे नमूद करून, या निकषावर भाषिक राज्यांची कल्पना टिकू शकत नाही व म्हणून ती स्वीकारता येत नाही असे मत श्री. दार यांनी व्यक्त केले होते."[१०]

दार समितीच्या अहवालाला देशभरातून प्रखर विरोध सुरू झाला. या विरोधाची तीव्रता कमी करण्यासाठी व भाषिक राज्याच्या प्रश्नाचा नव्याने विचार करण्यासाठी काँग्रेसने १९४८ च्या अखेरीस उच्चस्तरीय 'जेव्हीपी समिती' नेमली. या समितीने ५ एप्रिल १९४९ रोजी आपला अहवाल सादर केला. "दार समितीच्या निष्कर्षांची री ओढून भाषावार प्रांतरचनेमुळे निर्माण होणाऱ्या, अनेक दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या समस्यावर या समितीने भर दिला. समितीने सध्याची वेळ ही भाषिक पुनर्रचना करण्यास योग्य नाही, पण लोकांचा अविरत आग्रह असेल व त्यांच्या मनात भाषावार प्रांतरचना हवीच असेल तर या मागणीचा विचार करावा लागेल; पण त्याचबरोबर या योजनेचे परिणाम व धोके यांचाही विचार करावा लागेल, असे नमूद केले."[११]

या विरोधात भाषावार प्रांतरचनेच्या पुरस्कर्त्यांनी उपोषण सुरू केले. १९५२ मध्ये तेलगु भाषिक लोकांनी वेगळया राज्याची मागणी केली. 'पोट्टी श्रीरामुलु' यांनी आंध्रप्रदेशाच्या निर्मितीसाठी ५६ दिवस आमरण उपोषण केल्यामुळे १५ डिसेंबर १९५२ रोजी त्यांचे निधन झाले.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist. Dhule

त्यामुळे संपूर्ण तेलुगु भाषिक प्रदेशातील परिस्थिती हाताबाहेर गेली. परिणामी १९ डिसेंबर १९५२ रोजी केंद्र सरकारने मद्रास प्रांताचे विभाजन करून, आंध्रप्रदेश निर्माण करण्याची घोषणा केली. १ ऑक्टो. १९५३ रोजी 'आंध्रप्रदेश' तेलगू भाषिक राज्याची निर्मिती झाली.[१२] याबरोबरच संपूर्ण भारतभर भाषिक प्रांतरचनेच्या मागणीने उचल खाल्ली आणि भाषा व प्रदेश हे राजकारणात कळीचे मुद्दे बनले.

"२२ डिसेंबर १९५३ रोजी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतातील घटक राज्यांच्या पुनर्रचनेचा अभ्यास करण्यासाठी न्यायमूर्ती फजल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्यपुनर्रचना आयोगाची निर्मिती केली. ३० सप्टेंबर १९५५ रोजी राज्यपुनर्रचना आयोगाने आपला अहवाल सादर केला. या आयोगाने १४ घटक राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेश भाषिक आधारावर निर्माण करण्यात यावे अशी शिफारस केली. ही शिफारस नेहरू सरकारने मान्य केली.[१३] याप्रकारे अंतिमत: फजल अली आयोगाच्या शिफारशीनुसार भाषावार प्रांतरचना करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यातूनच गेल्या ६०—६५ वर्षांच्या कालावधीत भारतीय संघराज्यामध्ये भाषिक आधारावर घटक राज्यांची निर्मिती झाली. त्यामुळे "भारतीय संघराज्यातील आज अस्तित्वात असणारी जी घटक राज्ये आहेत, त्यांना भौगोलिक आधार, राजकीय आधार यापेक्षाही अधिक ठळकपणे भाषिक आधारच लाभलेला आहे. त्यामुळे अशी राज्ये ही निश्चितपणे भाषिक अस्मितेला पोषक अशीच ठरली आहे."[१४] त्यामुळे भाषेच्या राजकारणाला गती मिळाली.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
Late Dr. B. S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule

१९७१ च्या जनगणनेत १६५२ भाषांचा अंतर्भाव करण्यात आला होता. भारतीय संविधानात बावीस भाषा अंतर्भूत आहेत. घटनेच्या कलम ३४३ व ३४४ मध्ये भाषा संबंधित तरतूद आहे.[१५] तसेच भाषिक अल्पसंख्यांकांची तरतूद देखील संविधानात आहे. पुढे प्रादेशिक पक्षांच्या उदयाने भाषिक राजकारणाला अधिक गती मिळाली. महाराष्ट्रात शिवसेना या प्रादेशिक पक्षांने 'मराठी भाषा' हा मुद्दा घेऊन, प्रादेशिक राजकारणात आपली पकड निर्माण केली. पंजाबमध्ये अकाली दल तर आसाममध्ये आसाम गण परिषद ही काही प्रातिनिधिक उदाहरणे आहेत.

मागील काही वर्षापासून प्रदेशाच्या आधारावर स्वायत्ततेची मागणी केली जाते. यामध्ये प्रादेशिक पक्षांची महत्त्वाची भूमिका आहे. अशा मागण्या केंद्रात व राज्यात भिन्नभिन्न प्रादेशिक पक्षांचे शासन असल्यामुळे वाढत आहेत. उदाहरणादाखल सांगायचे झाल्यास पंजाबमध्ये मास्टर तारासिंगाच्या नेतृत्वाखालील अकाली दलाने धर्म व भाषेच्या आधारे स्वायत्त राज्याची मागणी केली होती. पश्चिम बंगालच्या मार्क्सवादी शासनाने स्वायत्ततेची मागणी पुन्हा पुन्हा केली. द्रमुक आणि अन्ना द्रमुक या पक्षाची राज्याच्या स्वायत्ततेची मागणी फार जुनी आहे.[१६] यावरून स्पष्ट होते की, प्रादेशिक पक्षांनी आपला प्रभाव वाढविण्यासाठी व व्यापक जनाधार मिळविण्यासाठी भाषा व प्रदेशाचे राजकारण केले आहे.

**भौगोलिक आणि सांस्कृतिक प्रभाव**

भारतात प्रादेशिक पक्षांचा उदय हा भौगोलिक व सांस्कृतिक घटकांच्या उल्लेखनीय भूमिकेतून होतो. अनेक प्रादेशिक राजकीय पक्षांनी हीच भावना जोपासत



Sakri (Dhule)
PRINCIPAL
I.S.S's Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

आपला प्रभाव निर्माण केला आहे. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार आदि राज्ये ही आकाराने मोठी आहे. त्यामुळे तेथील प्रादेशिक राजकारण वेगवेगळया स्वरूपाचे आहे. शिवाय तेथे प्रादेशिक अस्मितेपेक्षा आपण म्हणजे भारत आहोत, अशी एक नैसर्गिक भावना उत्तर प्रदेशात प्रचलित आहे. ऐतिहासिकदृष्ट्या प्रादेशिक राजकीय अस्मितेची येथे पार्श्वभूमी नाही. ब्रिटिश काळात वायव्य प्रांताचा काही भाग, अवध आणि इतर संस्थाने तसेच व पूर्वेकडील प्रदेश या सर्वांचा मिळून १९३७ मध्ये संयुक्त प्रांत निर्माण करण्यात आला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्याला उत्तर प्रदेश असे नाव देण्यात आले. या अवाढव्य प्रदेशाला स्वत:चे खास वेगळे आत्मभान नसल्यामुळे, त्याचा विस्तार आणि त्या विस्तृत भूप्रदेशाचे विभिन्न इतिहास यात शोधता येतो. मात्र हिंदी भाषा आणि हिंदू धार्मिक अस्मिता यांचा पगडा राज्यभर सर्वत्र पसरलेला आहे.[१७] येथे प्रादेशिक अस्मितेपेक्षा हिंदू धर्म ही भावना अधिक व्याापक आहे. यामुळे येथे प्रादेशिक पक्ष आपला प्रभाव पाडू शकले नाही. परंतु दक्षिणेकडील राज्यात मात्र सांस्कृतिक प्रभावामुळे येथे प्रादेशिक पक्ष प्रभावी आहेत. तामिळनाडूचे लोक आपल्या संस्कृतीचा गर्व बाळगतात आणि याआधारावर ते रामासारख्या देवावर टीका करतात. या कारणामुळेच १९७५ मध्ये येथे राम—लक्ष्मणाची पुस्तके जाळली होती.[१८] दक्षिणेतील राजकीय पक्ष हिंदी भाषा व उत्तर भारतीय संस्कृतीचा विरोध करतात.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
I.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

**आर्थिक घटकांचा प्रभाव**

प्रादेशिकतेच्या निर्मितीमध्ये आर्थिक घटक महत्त्वाचा आहे. एखादा प्रदेश सधन आहे किंवा निर्धन आहे, या दोन्ही बाबी राजकारणात तेवढ्याच महत्त्वाच्या ठरतात. सधन भाग हा विकासात नेहमी अग्रेसर असतो, तर निर्धन प्रदेश दुष्काळी व मागास राहतो. अशा स्थानिक मुद्यांना राष्ट्रीय पक्ष फारसे महत्त्व देत नाही, पण प्रादेशिक पक्ष मात्र असे मुद्दे आपला अजेंडा बनवतात. उदा. मुंबईतील मराठी तरुणांच्या रोजगाराचा मुद्दा, शेतकरी आत्महत्या, आर्थिक मागासलेपण इत्यादी प्रश्नांना शिवसेनेने प्राधान्य दिले आहे. देशात अशी अनेक राज्य आहेत, की जेथे आर्थिक असमतोल पाहायला मिळतो. अशा परिस्थितीत निर्धन प्रदेशांमध्ये असंतोष निर्माण होतो व त्यामुळे तेथे अलगाववादाची भावना निर्माण होते. परिणामी विकासाच्या नावावर राज्याच्या स्वायत्ततेची मागणी केली जाते. उदा. आंध्र प्रदेशातील तेलंगणा, उत्तर प्रदेशातील पूर्वांचल, बुंदेलखंड[१९] येथे अशा प्रकारचे राजकारण घडले आहे.

**जातीचा प्रभाव**

हेरॉल्ड गोल्ड यांच्यामते, 'जात राजकारणाचा आधार होण्यापेक्षा जात राजकारणाला प्रभावित करणारे एक तत्व आहे.' तर जयप्रकाश नारायण म्हणतात, 'जात भारतातील एक महत्त्वपूर्ण पक्ष आहे.' या दोन विधानावरून लक्षात येते की, जात राजकारणात अतिशय महत्त्वाची आहे. राष्ट्रीय राजकारणाबरोबरच प्रादेशिक राजकारणात जात महत्वाची भूमिका पार पाडते. एवढेच नाही तर प्रादेशिक स्तरावर जात हीच सर्वाधिक निर्णायक घटक ठरते. मायकेल ब्रेचर यांच्यामते, अखिल भारतीय राजकारणापेक्षा



Sakri (Dhule)
PRINCIPAL
I.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

राज्यस्तरावरील राजकारणात जातीवादाचा प्रभाव अधिक आहे. कोणतेही राज्य यापासून सुटलेले नाही. बिहार, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, हरियाणा, राजस्थान आदी. महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास जातीय गणिताच्या विश्लेषणाशिवाय करूच शकत नाही. बिहारच्या राजकारणात राजपूत, ब्राह्मण, कायस्थ आणि आदिवासी प्रमुख प्रतिस्पर्धी आहे. स्वतंत्र झारखंडची मागणी एकाच जातीची मागणी होती. केरळमध्ये साम्यवाद्यांचे यश इजावहा जातीच्या समर्थनावर अवलंबून आहे. आंध्रप्रदेश मध्ये कामा आणि रेड्डी या जाती महत्त्वाच्या आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा, ब्राह्मण, महार यांच्यात स्पर्धा असते. जे.ए.दस्तुर लिहितात, "ज्या दिवशी महाराष्ट्राची निर्मिती झाली, त्या दिवशीच या राज्याच्या राजकीय अभिजन वर्गात आणि राजकीय नेतृत्वात अधिक महत्त्वपूर्ण आणि मूलभूत परिवर्तन झाले. सत्ता, प्रभाव आणि शक्ती ब्राह्मणाच्या हातून निघून मराठ्यांच्या हातात पोहोचली."[२०] याचे उदाहरण म्हणजे शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या प्रादेशिक पक्षांना मराठा जातीचा जनाधार मिळाला. गुजरातमध्ये पाटीदार व क्षेत्रीय, केरळमध्ये ख्रिश्चन, हिंदू, मुस्लिम इत्यादी. तामिळनाडू मध्ये ब्राह्मण जातीचे वर्चस्व होते, याविरुद्ध रामास्वामी नायकर यांनी 'द्रविड कळघम' नावाची संघटना स्थापन केली. ह्या संघटनेचे रूपांतर पुढे 'द्रविड मुन्नेत्र कळघम' पक्षात झाले. पुढे १९४९ मध्ये सी.एन.अन्नादुराई यांच्या नेतृत्वात 'द्रमुक' पक्षाने 'ब्राम्हण विरोध' व ब्राह्मणेतर समर्थनाचे धोरण अंगीकारले. अशी अनेक उदाहरणे आहेत. याप्रकारे, जातीय राजकारणामुळेच प्रादेशिक पक्षांना आपला प्रभाव निर्माण करता आला.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.B.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

**महत्वकांक्षाचे राजकीयीकरण**

भारतातील राजकीय पक्षांनी आपल्या महत्वकांक्षाच्या पूर्ततेसाठी प्रादेशिकतेला प्रोत्साहन दिले. या पक्षांनी प्रादेशिक विकास व स्थानिक समस्यांना प्राधान्य देऊन, त्या मुद्यांच्या आधारे राजकारण सुरू केले. याप्रकारे द्रमुक, अन्ना द्रमुक, अकाली दल, तेलगु देसम, आसाम गण परिषद, भारतीय राष्ट्रीय लोकदल, नॅशनल कॉन्फरन्स, आदी.[२१] प्रादेशिक पक्षांनी राष्ट्रीय राजकारणाला प्रभावित केले आहे.

**सारांश**

वर्तमान काळात भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्ष अनिवार्य झाले आहे, हे वास्तव नाकारता येत नाही. या पक्षांनी स्थानिक मुद्यांना घेऊन आपला जनाधार वाढवला आहे. राष्ट्रीय पक्ष देखावा म्हणून एकीकरणाचा आधार घेतात, परंतु व्यवहारात मात्र प्रादेशिकता, नेतृत्व, धर्म, जात इत्यादी आधारावर मते मागतात. ही प्रवृत्ती वाढतच आहे. मुळात प्रादेशिक पक्ष उपरोक्त आधारावर उभे राहतात, म्हणून राष्ट्रीय पक्षांपेक्षा ते आपला जनाधार पक्का करतात. कारण राष्ट्रीय पक्षांपेक्षा प्रादेशिक किंवा स्थानिक अस्मिता व प्रादेशिक नेतृत्व मतदारांना अधिक जवळचे वाटत असते. मतदारांच्या दृष्टीने राष्ट्रीय आणि प्रादेशिक असा फारसा फरक उरला नाही. म्हणून प्रादेशिक पक्ष भारतीय राजकारणाच्या दिशा ठरवण्यात निर्णायक भूमिका पार पाडत आहेत. भारतात आज जवळजवळ दोन तृतीयांश राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष प्रभावशाली आहेत.

**संदर्भ**

१. जोशी मनोहर ग., २०११, 'शिवसेनची निर्मिती वाढ, स्वरुप, यशापयश आणि भवितव्य', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, पृ.१३८



V. U. Patil Arts and Late Dr. B. S. Desale Science College Sakri (Dhule)
PRINCIPAL
C.S.S's Sk. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

२. जैन पुखराज, फडिया बी.एल., २००८, 'भारतीय शासन एवं राजनीति', सोलहवां संस्करण, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा, पृ.४०८
३. पळशीकर सुहास, २००४, 'समकालिन भारतीय राजकारण : कॉंग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद', प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ. २५४
४. जैन पुखराज, फडिया बी.एल., २००८, उपरोक्त, क्र.२, पृ.४०८
५. सेठ नलिन, २०११, 'भारत में दलित राजनीति : उदय, विकास और प्रभाव', अल्फा पब्लिकेशन्स, न्यू दिल्ली, पृ.१९७
६. जैन पुखराज, फडिया बी.एल., २००८, उपरोक्त, क्र.२, पृ.४८२
७. कित्ता
८. मिश्र विश्वनाथ, २००६, 'भारतीय राजनीति में क्षेत्रवाद एवं नृजातीयता', विश्वविद्यालय प्रकाशन, सागर, पृ.४२
९. कित्ता
१०. सिरसीकर व.मं., २००१, 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ.४२
११. कित्ता, पृ.४४
१२. नीलम देवी, 'भारतीय राजनीति में पड़ने वाले क्षेत्रवाद के प्रभाव का विश्लेषणात्मक अध्ययन', जर्नल ऑफ अॅडवान्स अँड स्कॉलरली रिसर्चेस इन अलाइड एज्युकेशन, व्हॉल्यूम: १५, इश्यू: १२, डिसेंबर २०१८, इग्निटेड माइडंस जर्नल, ई—आयएसएसएन २२३०—७५४० : [redacted]
१३. कारेकर शोभा, घोडके शरद, २००८, 'महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण', अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर, पृ.३९
१४. कित्ता, पृ.४०
१५. जैन पुखराज, फडिया बी.एल., २००८, उपरोक्त, क्र.२, पृ. ४८३—४८५
१६. कित्ता, पृ.४६३
१७. पळशीकर सुहास, २०१५, 'देश — प्रदेश : प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा', द युनिक अॅकॅडमी, पुणे, द्वितीय आवृत्ती, पृ.१८७—१८८
१८. नीलम देवी, डिसेंबर २०१८, उपरोक्त, क्र.१२
१९. जैन पुखराज, फडिया बी.एल., २००८, उपरोक्त, क्र.२, पृ. ४४३—४४४
२०. व्होरा राजेंद्र व पळशीकर सुहास, २०१०, 'भारतीय लोकशाही : अर्थ व व्यवहार', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ.२६३ नीलम देवी, डिसेंबर २०१८, उपरोक्त, क्र.१२




Sakri (Dhule)
PRINCIPAL
C.S.S's Shri V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule